दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उपसंपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | शनिवार, 303 मे 2026 |
अंक क्र. 27 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com


दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
तर्फे वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...!



# लग्नानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत खाकी वर्दीचे स्वप्न साकार!

## अस्वलांबा गावची लेक ऋतुजा ढाकणे हिची मुंबई पोलीस दलात निवड

## ऋतुजा यांच्या संयमाचा, शांततेचा, कष्टाचा आणि मैदानात गाळलेल्या एक-एक घामाच्या थेंबाचा विजय झाला आहे.

**परळी वैजनाथ** – "जिद्द, चिकाटी आणि अखंड परिश्रमाचे मूर्तिमंत उदाहरण..." असे ज्या प्रवासाचे वर्णन करता येईल, असाच एक प्रेरणादायी प्रवास बीड जिल्ह्यातील आस्कलांभा गावच्या कन्येने करून दाखवला आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या, लग्नानंतरची कर्तव्ये आणि आर्थिक-मानसिक संकटांवर मात करत ऋतुजा प्रभाकर ढाकणे (बडे) हिची मुंबई पोलीस दलात दिमाखात निवड झाली आहे.

या यशासह ती अस्वलांबा गावातील पहिली महिला पोलीस ठरली असून, तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

**लग्नानंतर स्वप्नांची पानं गळू दिली नाहीत!**

अनेकदा लग्नानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे महिलांची स्वप्ने अर्धवट राहतात किंवा 'स्वप्नांची पानं गळून पडतात' अशी परिस्थिती निर्माण होते. मात्र, ऋतुजाने या विचारसरणीला आपल्या कर्तृत्वाने आणि अथांग कष्टाने थेट छेद दिला. लग्नानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना तिने खाकी वर्दी परिधान करण्याचे आपले स्वप्न कधीही संपू दिले नाही उलट अधिक ताकतीने आणि जिद्दीने तिने आपल्या स्वप्नांचा पाठलाग केला.

**पाठीवर संसाराचे ओझे, पायात कष्टाचे पाणी!**

ऋतुजाचा हा प्रवास वरवर दिसतो तितका सोपा नक्कीच नव्हता. तिच्या या खडतर दिनक्रमाची सुरुवात पहाटेपासूनच व्हायची सकाळी ६ वाजता ग्राउंड पहाटे उठून आधी मुलाचा शाळेचा डबा तयार करणे आणि घरचा स्वयंपाक आवरून ठीक ६ वाजता ती मैदानावर हजर असायची.

मैदानात पायातल्या कष्टाचे पाणी होईपर्यंत घाम गाळणे आणि शारीरिक चाचणीसाठी स्वतःला सज्ज करणे. थकलेल्या शरीराने अभ्यास: ग्राउंडवरून घरी परतल्यानंतर घरातील सर्व कामे उरकणे, मुलाचे आवरणे आणि त्यानंतर शरीर पूर्णपणे थकलेले असतानाही जिद्दीने अभ्यासाला बसणे.

कितीही मोठ्या अडचणी आल्या, मग त्या आर्थिक असोत की मानसिक, ऋतुजाने कधीच त्याचा गाजावाजा केला नाही. प्रत्येक संकटावर शांतपणे मात करायची आणि पूर्ण आक्रमकतेने मैदानात उतरायचे, हा तिच्या मनाचा पक्का निर्धार होता. आज तिच्या याच संयमाचा, शांततेचा, कष्टाचा आणि मैदानात गाळलेल्या एक-एक घामाच्या थेंबाचा विजय झाला आहे.

### जर ऋतुजा लग्नानंतर सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडून अंगावर खाकी आणि खांद्यावर गुलाल चढवू शकते, तर इतर मुली का नाही?

**महाराष्ट्रातील रणरागिणींना प्रेरणा देणारा प्रवास**

ऋतुजाचा हा संघर्षमयी आणि विजयी प्रवास महाराष्ट्रातील इतर सर्व मुलींसाठी आणि विशेषतः गृहिणींसाठी एक मोठा संदेश देतो. परिस्थिती कशीही असो, जर मनाशी पक्का निर्धार असेल तर नशीबसुद्धा तुम्हाला तुमचा हक्क मिळवून देण्यापासून रोखू शकत नाही.

जर ऋतुजा लग्नानंतर सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडून अंगावर खाकी आणि खांद्यावर गुलाल चढवू शकते, तर इतर मुली का नाही?

ऋतुजा प्रभाकर ढाकणे (बडे) हिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल आणि मुंबई पोलीस दलातील निवडीबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत असून पुढील वाटचालीस 'अतुल्य महाराष्ट्र न्यूज' कडून खूप खूप शुभेच्छा!



# परळीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती दिंडी रथयात्रेचे उत्साहात स्वागत

**परळी** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान, नांदेड यांच्या वतीने आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सव दिंडी रथयात्रेचे २७ मे रोजी परळी शहरात भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात स्वागत करण्यात आले. दिंडीतील भाविकांनी प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घेतले असून दिंडीचा मुक्काम श्री संत जगमित्र नागा मंदिर येथे झाला.



श्री संत जगमित्र नागा मंदिरात नगराध्यक्ष पद्मश्री धर्माधिकारी यांच्या हस्ते दिंडीचे स्वागत करण्यात आले. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे दर्शन व आरती करण्यात आली. दिंडी आगमनामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

२७ ते ३१ मे दरम्यान आयोजित ही दिंडी रथयात्रा श्रीक्षेत्र माळेगाव खंडोबा यात्रा (ता. लोहा, जि. नांदेड) येथून प्रारंभ होऊन श्रीक्षेत्र चौंडी (ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) येथे पोहोचणार आहे.

रथयात्रेचा पुढील प्रवास २८ मे रोजी परळीहून अंबाजोगाई, डिघोळ अंबा, चंदन सावरगाव व कुंबेफळ-केज मार्गे होणार आहे. त्यानंतर २९ मे रोजी कपिलधार व लिंबागणेश, ३० मे रोजी सोनेगाव फाटा–पाटोदा–धनगर जवळका मार्गे, तर ३१ मे रोजी हळगाव येथे मुक्काम करून दुपारी श्रीक्षेत्र चौंडी येथे यात्रेचा समारोप होणार आहे.

परळीतील स्वागत सोहळ्यावेळी दिगंबरराव धुमाळ, शिवाजीराव धुमाळ, अशोक धुमाळ, विनायक गडदे, ज्ञानोबा धायगुडे, प्रकाश धुमाळ, संजय धुमाळ, ॲड विजय धुमाळ ,,शरद धुमाळ प्रा. मुळे,आशा धुमाळ ,अनिता धुमाळ, सविता धुमाळ, गिरिजा धुमाळ ,शकुंतला धुमाळ ,स्वाती धुमाळ, निशा धुमाळ, सौ रोडे आदींसह अनेक भाविक उपस्थित होते.

# समुद्रात वाहून जाणारे २० टीएमसी पाणी दुष्काळी भागाला द्या!

## माजी आ.धोंडे आणि माजी आ. आजबे यांची नदीजोड प्रकल्पाच्या मुख्य अभियंत्यांकडे आग्रही मागणी; मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून नदीजोड प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याची मागणी

**आष्टी|प्रतिनिधी:** मराठवाड्यातील बीड जिल्ह्याचे 'दुष्काळाचे आगार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आष्टी, पाटोदा व शिरूर (का.) तालुक्यातील जनतेची तहान भागवण्यासाठी आता थेट समुद्रात वाहून जाणाऱ्या पाण्याचा आधार घेण्याची महत्त्वपूर्ण मागणी पुढे आली आहे.समुद्रात व्यर्थ वाहून जाणाऱ्या २०० टीएमसी पाण्यापैकी किमान २० टीएमसी पाणी या अवर्षणप्रवण पट्ट्याला मिळावे, अशी आग्रही मागणी माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नाशिक येथील मुख्य अभियंता (नदीजोड प्रकल्प समन्वय कक्ष) यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी मुख्याभ्यांता प्रकाश मिसाळ म्हणाले की, तुमच्या निवेदनाचा सहानभूतीपूर्वक विचार करून वरिष्ठांशी चर्चा केली जाईल.आपणही आपल्या पातळीवरून मंत्री महोदयांची चर्चा करावी असे शिष्टमंडळाशी बोलताना सांगितले.



बीड जिल्ह्यातील आष्टी,पाटोदा आणि शिरूर (का.) हे तीन तालुके कायमस्वरूपी अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. निसर्गाच्या लहरीपणामुळे या भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण होते. जानेवारी महिना उजाडताच पाण्यासाठी दाहीदिशा भटकावे लागते. पिण्यासाठीच पाणी नसल्याने शेतीचा प्रश्नच उद्भवत नाही. परिणामी,हाताला काम नसल्याने येथील लाखो भूमिपुत्रांना नाईलाजाने ऊसतोडणी व इतर मजुरीसाठी राज्यभर स्थलांतर करावे लागते. हे विदारक चित्र बदलण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. पश्चिम घाटातून अरबी समुद्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते.हे पाणी दुष्काळग्रस्त भागाकडे वळवण्याचा मनोदय ना.देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच अनेकदा व्यक्त केला आहे. याच धोरणाचा आधार घेत, नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून समुद्रात वाहून जाणारे पाणी या तीन तालुक्यांतील सुमारे २०० गावांना उपलब्ध करून द्यावे,जेणेकरून हा संपूर्ण भाग सुजलाम सुफलाम होईल. शासनाने यावर गांभीर्याने विचार करून तातडीने २० टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही सुरू करावी,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.नाशिक येथील सिंचन भवनात देण्यात आलेल्या या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आ. भीमराव धोंडे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आ. बाळासाहेब आजबे यांच्यासह परिसरातील अनेक प्रमुख कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या शिष्ट मंडळामध्ये

काकासाहेब शिंदे, दीपक घुमरे, विश्वास नागरगोजे, नियामत बेग, रत्नदीप निकाळजे, अशोक साळवे, भाऊसाहेब लटपटे,

पांडुरंग नागरगोजे, रामराव खेडकर, दादासाहेब जगताप,उत्तम बोडखे,सतिशमामा झगडे,झुंबर चव्हाण,बजरंग कर्डीले,उद्धव विधाते,शहादेव गर्जे,बाबासाहेब वाघुले,केशव शिंदे, अशोक खेडकर, अंकुश मुंढे,संतोष गोल्हार,शहादेव गर्जे,सुरेश माळी, महादेव दानवे, चेअरमन राजाराम ननवरे,हरिभाऊ जंजिरे,पांडुरंग गावडे,नानाभाऊ वाडेकर,विठ्ठल लांडगे,दिपक घुमरे, बाबुराव जाधव, अनिल जायभाय, बाळासाहेब शेकडे, संदीप नागरगोजे, सागर वनवे,शाम हुले,तात्यासाहेब लाड,सचिन जायभाय,भागवत वारे,सावळेराम जायभाय,

अभिलाश गाडैकर , वैभव बडे,महारूद्र खेडकर,डॉ.प्रभाकर कवठेकर,कचरू काळे,तात्यासाहेब लाड आणि शिवाजी थोरवे आदींचा समावेश आहे.

# निवडणुका जिंकणे आणि अर्थव्यवस्था मजबूत ठेवणे हे वेगवेगळे विषय : डॉ. भारत कऱ्हाड

लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणुका जिंकणे हे कोणत्याही राजकीय पक्षासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. निवडणुकीतील विजय हा जनतेचा विश्वास, नेतृत्वाची स्वीकारार्हता आणि राजकीय संघटनशक्ती यांचे प्रतीक असतो. मात्र केवळ निवडणुका जिंकणे म्हणजे देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे मजबूत झाली आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरत नाही. राजकारण आणि अर्थकारण हे एकमेकांशी संबंधित असले तरी त्यांचे परिणाम आणि मोजमाप वेगवेगळ्या निकषांवर होत असतात. एखादे सरकार जनतेमध्ये लोकप्रिय असू शकते, परंतु त्याच वेळी अर्थव्यवस्थेसमोर रोजगार, गुंतवणूक, उत्पादनक्षमता, महागाई किंवा असमानता यांसारखी गंभीर आव्हानेही उभी असू शकतात.



भारतात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर इन्फ्रास्ट्रक्चर विकास झाला आहे. देशभरात एक्सप्रेसवे, मेट्रो प्रकल्प, नवीन एअरपोर्ट्स, रेल्वे मॉडर्नायझेशन, बंदरांचा विकास आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीमध्ये मोठी वाढ झाली आहे. डिजिटल पेमेंट व्यवस्था, यूपीआय प्रणाली आणि ऑनलाईन व्यवहार यामुळे भारताने जगात वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्टार्टअप संस्कृतीला चालना मिळाली असून अनेक तरुण उद्योजक नव्या कल्पनांसह पुढे येताना दिसत आहेत. या सर्व गोष्टी देशाच्या आर्थिक क्षमतेचे सकारात्मक चित्र निर्माण करतात.

भारत आज जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून वेगाने पुढे येत आहे. अनेक जागतिक आर्थिक संस्थांनी भारताच्या ग्रोथ रेट बाबत सकारात्मक अंदाज व्यक्त केले आहेत. काही क्षेत्रांमध्ये भारताने जागतिक स्तरावर प्रभाव निर्माण केला आहे. मोबाईल मॅन्युफॅक्चरिंग, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्मिती, सेवा क्षेत्र आणि संरक्षण उत्पादन यामध्ये भारताची भूमिका वाढताना दिसत आहे. त्यामुळे भारत आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे मागे जात आहे असे म्हणणे वास्तववादी ठरणार नाही.

तथापि अलीकडच्या काळात काही अर्थतज्ज्ञ आणि तज्ञ मंडळींकडून केंद्र सरकारच्या अर्थनीतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यांच्या मते देशात इन्फ्रास्ट्रक्चर विकास वेगाने होत असला तरी रोजगारनिर्मिती अपेक्षित प्रमाणात होत नाही. मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्र अजूनही जागतिक स्पर्धेत पूर्ण ताकदीने उभे राहिलेले नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील ताण कायम आहे. काही तज्ज्ञ परकीय गुंतवणुकीतील चढ-उतार, वाढती आर्थिक असमानता, महागाईचा मध्यमवर्गावर होणारा परिणाम आणि लघुउद्योगांना भेडसावणाऱ्या अडचणी याकडे लक्ष वेधतात. काहींच्या मते आर्थिक धोरणांमध्ये मोठ्या प्रकल्पांना आणि कॉर्पोरेट क्षेत्राला प्राधान्य दिले जात आहे, तर दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांच्या खरेदी क्षमतेकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही अशी टीकाही केली जाते.

रोजगाराचा विषय हा आजच्या काळातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा मानला जातो. उच्चशिक्षित तरुणांची संख्या वाढत असताना गुणवत्तापूर्ण आणि स्थिर रोजगार त्याच प्रमाणात उपलब्ध होत आहेत का, हा गंभीर प्रश्न आहे. अनेक तरुण स्पर्धा परीक्षांच्या चक्रात अडकलेले दिसतात. काही जण अल्प वेतनाच्या कॉन्ट्रॅक्ट जॉब्समध्ये काम करतात, तर काहींना त्यांच्या शिक्षणाशी सुसंगत रोजगार मिळत नाही. बेरोजगारीचा प्रश्न केवळ आर्थिक नसून सामाजिक असंतोष निर्माण करणारा विषयही ठरू शकतो.

ग्रामीण भारताची परिस्थितीही अनेकदा चिंताजनक दिसते. शेतीवरील वाढते उत्पादन खर्च, हवामानातील अनिश्चितता, बाजारातील चढ-उतार आणि कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी वर्ग अनेक अडचणींना सामोरे जात आहे. शहरांमध्ये विकासाची गती वेगवान दिसत असताना ग्रामीण भागात आर्थिक संघर्ष कायम असल्याची भावना निर्माण होते. त्यामुळे विकासाचा लाभ सर्व स्तरांपर्यंत समान प्रमाणात पोहोचत आहे का, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

## इंजेगाव येथे अधिक मासानिमित्त जगद्गुरू तुकोबाराय गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन

**सिरसाळा (अतुल बडे)** : परळी वैजनाथ तालुक्यातील इंजेगाव येथे अधिक मासानिमित्त भव्य "जगद्गुरु तुकोबाराय गाथा पारायण सोहळा" आयोजित करण्यात आला आहे. हा धार्मिक व आध्यात्मिक सोहळा दि. 30 मे 2026 पासून सुरु होणार असून रविवार दि. 31 मे 2026 रोजी सांगता होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन योगानंद निवास, इंजेगाव येथे करण्यात आले आहे. तरी या धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशितील भाविकांनी

मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन कराड परिवार यांनी केले आहे.





अधिक मासानिमित्त इंजेगाव येथे जगद्वरु तुकोबाराय गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पारायण सोहळ्यात गाथा पारायण प्रमुख म्हणून गाथामूर्ती ह.भ.प. श्री. माऊली महाराज रुमणेकर यांचे मार्गदर्शन लाभणार असून त्यांना पखवाज साथ श्री. माणिक महाराज शिंदे यांची राहणार आहे. दररोज सकाळी 7 ते 12 या वेळेत पारायण तर सायंकाळी 5 ते 7 या 2026 रोजी दुपारी 1 ते 3 या वेळेत ह.भ.प. आचार्य लक्ष्मण महाराज कुंडगर (अध्यापक, गाथा मंदिर देहू) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे व्यवस्थापक म्हणून समस्त तरुण मित्र मंडळ इंजेगाव हे आहेत. या धार्मिक कार्यक्रमास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गाथा पारायण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक श्रीमती आशाबाई योगानंद कराड, संदीप योगानंद कराड व लालू योगानंद कराड यांनी केले आहे.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# वैद्यनाथ नगरीत अधिक मासानिमित्त इष्टलिंग महापूजा; काशी जगद्गुरूंच्या उपस्थितीत 'मार्ग हा मुक्तीचा' ग्रंथाचे विमोचन


**परळी वैजनाथ /प्रतिनिधी**

अधिक मासानिमित्त वैद्यनाथ ज्योतिर्लिंग नगरी परळीत गुरुवारी धार्मिक वातावरणात इष्टलिंग महापूजा, धर्मसभा आणि 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाच्या विमोचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. काशी पीठाचे जगद्गुरू श्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी गुरुवारी परळीत दाखल झाले. यावेळी त्यांच्यासोबत सोनपेठचे श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज, श्री ष .ब्र.१०८ सदाशिव शिवाचार्य महाराज वेळापुरकर तसेच अन्य शिवाचार्य उपस्थित होते. श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने अधिक मासानिमित्त श्री वैद्यनाथ देवस्थान







ट्रस्टच्या वैद्यनाथ प्रवचन मंडपात इष्टलिंग महापूजा, त्यानंतर धर्मसभा आणि 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाच्या विमोचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. काशी जगद्गुरूंच्या उपस्थितीत राज्यभर ३० दिवसांत ५० ठिकाणी इष्टलिंग महापूजा, धर्मसभा आणि ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले असून त्याच मालिकेतील हा परळीतील कार्यक्रम होता. धर्मसभेत मार्गदर्शन करताना काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले की, "इष्टलिंग पूजा करणाऱ्या भक्ताला अपेक्षित फलप्राप्ती मिळते. प्रत्येकाने दररोज स्नानानंतर वीरशैव बांधवांनी इष्टलिंगाची पूजा करून जल दाखवल्यानंतर भोजन करावे." त्यांनी 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथातील पाच सूत्रांचे विवेचन करत मुक्तीचा मार्ग समजून घेण्यासाठी ग्रंथ वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. अधिक मासाचे धार्मिक महत्त्व स्पष्ट करत त्यांनी भाविकांना ग्रंथ वाचनाचे आवाहन केले. इष्टलिंग महापूजेस मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

यावेळी श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टचे सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख, विश्वस्त विजयकुमार मेनकुदळे, डॉ. सुरेश चौधरी, श्री वक्रेश्वर देवस्थान मंदिराचे अध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे, श्री गुरुलिंग स्वामी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दत्तापा ईटके, नगरसेविका जयश्रीताई मोगरकर, माजी नगरसेविका उमाताई समशेट्टी, श्रद्धाताई हालगे, स्वाती अष्टेकर , शिक्षण समिती सभापती योगेश मेनकुदळे, श्यामभाऊ बुद्रे, रमेश चौंडे, विकास हालगे, नितीन समशेट्टी, अश्विन मोगरकर, नगरसेवक नितीन बागवाले, कार्यकर्ते चेतन सौंदळे, सोमनाथ गोपनपाळे, प्रकाश खोत, अनिल अष्टेकर, सचिन स्वामी, राजू तीळकरी, दत्तात्रेय गोपनपाळे, ओम प्रकाश बुरांडे, संजय खाकरे, संतोष जुजगर, रमाकांत बुरांडे, चंदू हालगे, रमाकांत गुजर, बबलू गोपनपाळे यांच्यासह विविध मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

# खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांनी घेतले प्रभू वैद्यनाथांचे दर्शन

**परळी वैजनाथ, प्रतिनिधी :**

शिवसेनेचे नेते तथा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथराव शिंदे यांनी आज श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथांचे भक्तिभावाने दर्शन घेतले. यावेळी वैद्यनाथ नगरीत आगमन झाल्याबद्दल तमाम परळीकरांच्या वतीने त्यांचा माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या हस्ते हृदय सत्कार करण्यात आला.

दर्शनानंतर खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रभू वैद्यनाथांच्या चरणी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी, जनतेच्या सुख-समृद्धीसाठी तसेच सर्वांच्या उत्तम आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना केली. त्यांच्या भेटीमुळे मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी,



कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. शिंदे यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. परळी वैजनाथ येथे आपण यापूर्वीही दर्शनाला आलो होतो. प्रभू वैजनाथच्या दर्शनाने व परळीकरांच्या प्रेमाने आपण भारावून गेलो असल्याची भावना यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केली.

# बरकतनगर भागात सरस्वती नदी स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर; नगर परिषदेची मान्सूनपूर्व तयारी वेगात!

## माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व पदाधिकाऱ्यांनी केली प्रत्यक्ष पाहणी

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पूरस्थिती, पाण्याचा अडथळा आणि अस्वच्छतेचा त्रास होऊ नये यासाठी परळी वैजनाथ नगर परिषदेमार्फत बरकतनगर येथील स. नं. ७५ भागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीची मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर हाती घेण्यात आली आहे. मानसूनपूर्व सुरू असलेल्या या कामांची माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांच्यासह त्या प्रभागातील संबंधित नगरसेवक व न. प.पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

या मोहिमेअंतर्गत नदीपात्रातील गाळ, कचरा, झुडपे तसेच पाण्याच्या



प्रवाहाला अडथळा ठरणारे घटक हटविण्याचे काम सुरू आहे. अनेक वर्षांपासून साचलेला गाळ काढून नदीचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत करण्यासाठी नगर परिषद प्रशासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. सुरू असलेल्या कामांचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना कामाची गुणवत्ता, गती आणि स्वच्छतेबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. शहरातील विविध भागांमध्ये मान्सूनपूर्व नाले व नदी स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत असून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. स्वच्छ, सुरक्षित आणि पूरमुक्त परळी घडविण्यासाठी नगर परिषद कटिबद्ध असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, माजी उपनगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष आयुब पठाण, श्रीकृष्ण कराड, अनंत इंगळे,नगरसेवक मोहसीन, नगरसेवक बब्बू, आदींसह पदाधिकारी तसेच नगर परिषद अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## लातूर ग्रामीण मध्ये क्रांती घडविणारे

# लोकप्रिय आमदार रमेशअप्पा कराड

## "रामेश्वरच्या मातीत उगवला मानाचा तुरा लातूरच्या मुकुटात शोभला रामेश्वरचा हिरा"





लातूर ग्रामीणच्या राजकीय, सामाजिक आणि वैचारिक इतिहासाने नोंद घेण्यासारखे कार्य करणारे लोकनेते म्हणून रमेशअप्पा कराड यांनी अल्पावधीतच स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. जन्मापासूनच अध्यात्माचा वारसा लाभलेल्या रामेश्वरच्या कराड घराण्यात रमेशअप्पांचा जन्म झाला. डॉ. विश्वनाथ दा. कराड ऊर्फ अण्णाभाऊ यांच्या सुसंस्कृत, कुटूंबवत्सल मार्गदर्शनात अप्पांनी आपल्या विचारांचा वारसा पुढे चालू ठेवला.

लातूर ग्रामीण मध्ये केवळ राजकारण न करता रमेशअप्पांनी लोकांना संस्काराची समन्वयाची आणि विकासाची एक नवी दिशा दाखवली आहे. कराड घराण्यात राजकारणाचा कुठलाही वारसा नसताना रमेशअप्पांनी तो स्वतः निर्माण केला. त्यांचे प्रतिबिंब ऋषिकेश कराड यांच्या रूपाने लातूर ग्रामीणच्या लोकांना अनुभवायला मिळत आहे. आपल्याला मिळालेल्या लोकप्रियतेचा आणि पदाचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी न करता जनतेच्या विकासासाठी करणारे एकमेव आमदार म्हणून रमेशअप्पा कराड यांना सर्वत्र ओळखले जाते. वर्षानुवर्षापासून प्रस्थापित राजकारण्यांच्या दुर्लक्षामुळे मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या लातूर ग्रामीणच्या जनतेला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. स्वतःच्या यशापयशाचा विचार न करता आ. रमेशअप्पा कराड यांनी अविरतपणे जनतेच्या सेवेसाठी समर्पण भावनेतून आपले कार्य चालू ठेवले. विशेषत: पर्यावरण रक्षणासाठी लोकांना प्रेरणा मिळावी म्हणून लातूर ग्रामीण मतदारसंघातील प्रत्येक गावामध्ये वृक्षारोपणासाठी मोठी मोहीम चालू केली स्वखर्चाने वृक्षारोपण केले. लोकांच्या आरोग्य रक्षणासाठी एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रूग्णालया मार्फत प्रत्येक गावामध्ये आरोग्य शिबिरे घेतली. अध्यात्माच्या माध्यमातून लोकप्रबोधन करण्यासाठी अप्पांनी गावोगावच्या भजनी मंडळांना भजन साहित्याचे वाटप केले. लातूर ग्रामीणच्या अनेक गावांमधील गणेश मंडळांना गणेश मूर्तीचे वाटप केले. आपल्या ग्रामीण मतदारसंघातील कोणत्याही कुटुंबावर कसलेही संकट आले तर आ. रमेशअप्पा कराड संकटग्रस्त कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. मागील काळात पुराने उध्वस्त झालेली कुटुंबे, आगीने भस्मसात झालेले अनेक घरे रमेशअप्पांनी स्वखर्चाने उभारली आहेत. आ. रमेशअप्पा हे मतदारसंघातील लोकांना मदत करताना कधी जातीपातीचा विचार करत नाहीत.

लातूर ग्रामीण मतदारसंघातील जनतेच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेऊन रमेशअप्पांनी प्रत्येक गावात पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला असून आज प्रत्येक गावात रस्ते, वीज, पाणी, आरोग्य व शिक्षण सर्व दूरपर्यंत म्हणजे शेवटच्या घरापर्यंत पोहोचले आहे.

आ. रमेशअप्पा कराड हे कुशल संघटक असून त्यांची प्रशासनावर पकड आहे. लाखो लोकांच्या ऱ्हदयातील ते एक ताईत बनले आहेत. कुठल्याही जातीपातींचा विचार न करता ते बहूजन समाजासाठी रात्रंदिवस अविरतपणे कार्य करत आहेत.

सतत कार्यरत राहून लोकांच्या समस्यांची सोडवणूक करणाऱ्या आमदार रमेशअप्पा कराड साहेबांना उदंड दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना...!



**शब्दांकन**
**प्रा. धनंजय दत्तात्रय बिक्कड**
**रा. फकराबाद**
**ता. वाशी**
**जि. धाराशिव.**



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शनिवार 30 मे 2026



# संघर्षातून उभा राहिलेला जननेता
# आ. रमेशअप्पा कराड

लातूर ग्रामीणच्या धुळीने माखलेल्या वाटेवर, शेतकऱ्यांच्या घामाने भिजलेल्या कपड्यात आणि सामान्य कुटुंबांच्या आशावादी नजरेत एक नाव सदैव प्रकाशमान राहते आ. रमेशअप्पा कराड. ते केवळ आमदार नाहीत. ते एक जिवंत भाव आहेत, एक विश्वासू मित्र आहेत आणि लाखो सामान्यांच्या मनात घर करणारा 'आपला माणूस' आहेत. राजकारणात जिथे नेते दूर उभे राहतात, तिथे अप्पा लोकांच्या मध्यभागी उभे राहतात. खांद्याला खांदा लावून, डोळ्यात डोळा घालून. खेड्यातून उगवलेला सूर्य रामेश्वर (रुई) या छोट्याशा खेड्यात जन्मलेल्या रमेश काशीराम कराड यांनी कधीही सोन्याच्या चमच्याने जन्म घेतला नाही. कष्टकऱ्या कुटुंबात जन्म, संघर्षाने पूर्ण केलेले शिक्षण - बी.कॉम. आणि बी.एड. - आणि नंतर शेती, दूध व्यवसायात रुजलेली मुळे. गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रेरणेतून राजकारणात प्रवेश केला. दोन पराभवांनी त्यांना खचवले नाही, उलट अधिक कणखर बनवले. २०२४ मध्ये लातूर ग्रामीण मतदारसंघात जनतेच्या प्रेमाने त्यांनी भव्य विजय मिळवला. हा विजय केवळ मतांचा नव्हता, तर विश्वासाचा होता. साधेपणा हाच त्यांचा ब्रँड.













### आजही अप्पा जेव्हा गावोगाव फिरतात, तेव्हा

"आमदार साहेब" नसून फक्त "अप्पा" म्हणून ओळखले जातात. महागड्या गाड्या, सुरक्षेचा घेरा किंवा दिखाऊपणा त्यांच्या शैलीत नाही. ते शेतकऱ्यांच्या बांधावर बसतात, विद्यार्थ्यांचे प्रश्न ऐकतात, महिलांच्या अडचणी समजून घेतात आणि त्या सोडवण्यासाठी रात्रंदिवस धावपळ करतात. रस्त्यांचा विकास, पाण्याचे प्रश्न, गूळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी साखर कारखाना, ग्रामीण भागातील शिक्षण आणि आरोग्य सुविधा - हे सर्व अप्पा यांच्या प्राधान्यक्रमात आहेत. त्यांनी लातूर ग्रामीणचा चेहरामोहरा बदलण्यासाठी सातत्याने मेहनत घेतली आहे आणि घेत आहेत. जनसेवा हीच त्यांचा धर्म आजकाल नेते "जनसेवा" हा शब्द वारंवार उच्चारतात, पण अप्पा यांच्यासाठी हा शब्द केवळ घोषणा नाही, तर रक्तात भिनलेला धर्म आहे.

### रमेशअप्पा कराड मुंडे वारशाचे जिवंत वाहक

रमेशअप्पा कराड हे मुंडे साहेबांचे खरे अनुयायी आहेत. मुंडे साहेबांच्या निधनानंतर लातूर ग्रामीणमध्ये पक्षाची धुरा सांभाळणारे, दोन पराभव पचवूनही हार न मानणारे आणि जनसेवेची ज्योत प्रज्वलित ठेवणारे अप्पा, मुंडे विचारांचे साक्षात प्रतिबिंब आहेत. अप्पा यांच्यात मुंडे साहेबांचा साधेपणा, जनसंपर्क, शेतकऱ्यांप्रती प्रेम आणि विकासाची तळमळ दिसते. ते जेव्हा गावोगाव फिरतात, शेतकऱ्यांच्या बांधावर बसतात आणि "अप्पा" म्हणून ओळखले जातात, तेव्हा मुंडे साहेबांच्या वारशाची जाणीव होते - की खरा नेता जन्माने येत नाही, तर लोकांच्या मनात राहून येतो. मुंडे वारसा आजही जिवंत आहे कारण रमेशअप्पा कराड सारखे नेते त्याला पुढे नेत आहेत. हा वारसा फक्त राजकीय नाही, तर जनसेवेचा, साधेपणाचा, संघर्षाचा आणि विकासाचा आहे. मुंडे साहेब म्हणायचे, "जनता ही देवता आहे." अप्पा हे या वाक्याचे जिवंत उदाहरण आहेत.

ते स्वतः शेती करतात, कुटुंब सांभाळतात आणि लोकांच्या दुःख-दरिद्र्यात सहभागी होतात. त्यामुळे शेतकरी, युवक, महिला, विद्यार्थी - प्रत्येक वर्गाला ते आपले वाटतात. त्यांच्या जीवनातून स्पष्ट होते की, खरा नेता जन्माने मोठा होत नाही, तर मेहनत, निष्ठा आणि लोकप्रेमाने मोठा होतो. रमेशअप्पा कराड हे सिद्ध करतात की, राजकारणातही माणुसपण जिवंत ठेवता येते. ते प्रस्थापितांच्या वर्चस्वाला आव्हान देत, सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षांचे खरे प्रतिनिधित्व करतात.

## जनतेशी नाळ, दांडगा जनसंपर्क

शेतकरी-जनसामान्यांची मदत आणि उत्तम संघटन कौशल्य या चार गुणांमुळे रमेशअप्पा कराड हे केवळ एक आमदार नव्हे, तर सर्वसामान्य माणसाचे खरे प्रतिनिधी बनले आहेत. ते राजकारणात "लोक" आणि "नेता" यांच्यातील दरी भरून काढणारे एक दुर्मीळ नेतृत्व आहेत. अप्पा यांचा जनसंपर्क अफाट आणि अखंड आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत ते गावोगाव, खेड्यापाड्यांत फिरतात. शेतकऱ्यांच्या बांधावर, चहाच्या टपरीवर, गावच्या चौकात आणि घराघरात ते सहज मिसळतात. "आमदार साहेब" ऐवजी सर्वजण त्यांना प्रेमाने "अप्पा" म्हणून हाक मारतात. हा संपर्क केवळ राजकीय नाही, तर भावनिक आणि विश्वासाचा आहे. कोणतीही समस्या असली तरी लोक सरळ अप्पांकडे धावतात, कारण त्यांना माहिती आहे की अप्पा ऐकतील आणि तोडगा काढतील.

अप्पा, तुम्ही आमचे आहात...
आणि आम्ही कायम तुमचे राहू ! जय जनसेवा !